**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२० /२०२४**

**निशाणी क्र.१६ लगत**

**<u>पुढील सरतपास अर्जदारतर्फे वकील श्री. एस बी खान यांच्यामार्फत सुरु :-</u>**

माझ्या सरतपासातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे नमूद केला असून तो खरा व बरोबर आहे. आता मला नि.३/१ कडील अर्जदार क्र.२ चे बोनाफाईट सर्टीफिकेट दाखविण्यात आले. त्यास **नि.१८** देण्यात येते. आता मला नि.३/२ ते ३/४ कडील अर्जदार कडील २ च्या फी भरल्याच्या पावत्या दाखविण्यात आल्या. त्यांना अनुक्रमे **नि.१९ ते नि.२१** देण्यात येते. आता मला नि.३/५ कडील अर्जदार क्र.३ चे बोनाफाईट सर्टीफिकेट दाखविण्यात आले. त्यास **नि.२२** देण्यात येते.

<u>सरतपास पुर्ण.</u>

**<u>उलटतपास जाबदेणार वकिल श्री ए. एस. धारुरकर यांचेमार्फत सुरुः-</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, फौ.कि.अर्ज क्र.४५१/२०१८ मधील आदेशाविरुध्द जाबदेणार यांनी दाखल केलेले अपिल इंदापूर येथील जिंल्हा व सत्र न्यायालयात प्रल बीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे जाबदेणार अपिलातील विलंब माफीच्या अर्जावरील अंतिम आदेशानुसार दरमहा रु.३ हजार निर्वाहभत्याची रक्कम मला देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर आदेशानुसार, निर्वाहभत्यांची रक्कम कमी झाल्याने नाराज होवून व त्या रागातून मी प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. माझे बँक ऑफ बडोदा येथे खाते आहे. मी सदर खाते उघडल्यापासून आजपर्यंतचा खाते उतारा न्यायालयात दाखल करण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर खातेउतारा दाखल केल्यास माझा वेगळा व्यवसाय असल्याचे व त्यामधून माझ्या उत्पन्नाचा स्त्रोत न्यायालयासमोर येईल म्हणून मी खातेउतारा दाखल करण्यास तयार नाही.

०३. मी फोन वापरते. मी फोनपे चा वापर करते. मी फोनपे सुरू केल्यापासून आजपर्यंतचे त्यावरील व्यवहाराचे उतारे दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा ब्युटीपार्लरचा कोर्स झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा ब्युटीपार्लरचा चांगला व्यवसाय सरस्वती नगर येथे युनिक ब्युटीपार्लर नावाने माझ्या घरी सुरू आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुरूवातीला माझा ब्युटीपार्लरचा व्यवसाय बारामती इंदापूर रस्त्यालगत गाळ्यामध्ये होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत जाबदेणार यास समजल्याने तो त्याचा पुरावा न्यायालयात देईल या भितीने सध्या मी सदर व्यवसाय माझ्या वडिलांच्या घरी सुरू केला आहे.

०४. माझे वडिल मासे विक्रीचा व्यवसाय करतात. याव्यतिरीक्त माझे वडील कोणताही व्यवसाय करीत नाही. माझ्या वडीलांकडे रिक्षा आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे वडील रिक्षा चालविण्याचा व्यवसाय करतात. जाबदेणार याने दोन मुलींसहीत मला नांदायला नेल्यास मी नांदायला जाण्यास तयार नाही. मी मुळ अर्जात पोटगी

वाढवून मिळावी अशी मागणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अर्जात पोटगी वाढवून मिळावी अशी काणतीही मागणी नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही व जाबदेणार यांनी विवाहाचा खर्च निम्मा निम्मा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, विवाहानंतर सुरूवातीचे १५ दिवस मी अकलुज येथे रहिले व नंतर जाबदेणार यांच्याबरोबर मुंबई येथे राहण्यास गेले. हे म्हणणे खरे नाही की, विवाहाच्या ३ महिन्यानंतर मी घरातील कामे व्यवस्थीत करीत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, विवाह झाला त्यावेळी माझी शरिरयष्टी आतापेक्षा बारीक होती. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मला घरातील कामे होत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे घरातील सर्व कामे माझी भावजय व सासू करीत होती. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणाराचे कुटूंबिय मी अशक्त असल्याचे माझी संपुर्ण काळजी घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार याने गरोदरपणात माझी संपुर्ण काळजी घेतली. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार व त्याचे कुटूंबीय माझी मुलगी २ महिन्यांची झाल्यानंतर मी नांदायला नेण्यासाठी माहेरी आले त्यावेळी मी व माझ्या आई वडिलांनी त्यांना नकार दिला. मुलगी झाल्यांनतर मी एक वर्ष आई वडिलांकडे होते. सदर एक वर्षाच्या कालावधीत मी जाबदेणार यांना विधीज्ञांमार्फत नांदविण्याकरीता नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला जाबदेणार याच्यासोबत सुरुवातीपासून नांदायची इच्छा नसल्याने तशी नोटीस पाठविली नाही.

०६. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदेणार व त्यांच्या कुटूंबीयांविरुध्द रागातून खोटा पोटगी अर्ज क्र ४८/२०१२ दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की त्या अर्जाचे कामी तडजोड होवून जाबदेणार यांनी मला नांदायला नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे जाबदेणार याची सुरुवातीपासून मला नांदायला नेण्याची तीव्र इच्छा होती. हे म्हणणे खरे नाही की, माझी सुरुवातीपासून नांदायची इच्छा नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी मुंबईच्या वातावरणात आजारी पडत असल्याने मला जाबदेणार याने अकलूज येथे ठेवले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या इच्छेखातर जाबदेणार यांनी नोकरी सोडून मुंबईहुन अकलूज येण्याचा निर्णय घेतला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी व जाबदेणार असे मिळून जाबदेणार याच्या आई वडिलापासून विभक्त राहू लागलो. हे म्हणणे खरे नाही की, अकलूज इंदापूर पासून जवळ असल्याने माझे आई वडिल नेहमी अकलूजला येवू लागले व मी नेहमी इंदापूर ला जावू लागले. हे म्हणणे खरे नाही की, अकलूज येथे जाबदेणार यास कोणताही कामधंदा नव्हता. अकलूज येथे जाबदेणार बॅटरीच्या दुकानात काम करीत होता. त्या दुकानाचे व मालकाचे नाव मला सांगता येणार नाही. त्याबाबत पुरावा दाखल करता येणार नाही.

०७. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी जाबदेणार कोणताही कामधंदा करीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार मशिदीची सेवा करुन जीवन जगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अकलूज येथे जाबदेणारसोबत नांदत असताना माझ्या आई वडिलांनी तेथे येवून जाबदेणार गलीच्छ भाषेत शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे आहे

की, मी अकलूज येथे असताना दुसऱ्यांदा गरोदर राहिले व दुसऱ्या मुलीचा जन्म झाला. हे म्हणणे खरे नाही की, माझ वडिल अकलूज येथे आले व जाबदेणासमक्ष मला असे म्हणाले की, तु विषारी औषण पिवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न कर, मी जाबदेणार यांच्यासहीत संपुर्ण कुटूंबाला खोट्या कसेमध्ये गुंतवतो, गजाआड करतो.

०८. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी असीन सराटी येथील जिजामाता शाळैत शिकत होती. हे म्हणणे खरे नाही की, उन्हाळयाच्या सुट्टीत मी मुलींना घेवून इंदापूर येथे राहण्यास गेले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी जाबदेणार मला नांदायला नेण्यासाठी आला व मुलींचे शिक्षणाचे नुकसान होईल अकलूज येथे जावू असे म्हटले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी जाबदेणार यास नांदायला येण्यास नकार दिला. मी व माझ्या वडिलांनी माझ्या मूलींचा प्रवेश इंदापूर येथील शाळेत घेतला. त्यावेळी मुलीचा प्रवेश इंदापूर येथिल शाळेत घेण्याबाबत आम्ही जाबदेणार यास विचारले नाही.

प्रश्नः– तुम्ही अकलूज येथील शाळा सोडून इंदापूर येथिल शाळेत मुलीचा प्रवेश घेण्याचे का निश्चीत केले?

उत्तरः–जाबदेणार याने मला व मुलींना हाकलून दिले होते, त्यानंतर जाबदेणार आम्हाला नांदायला नेण्यास आला नाही त्यामुळे तसा निर्णय घेतला.

०९. त्यावेळीदेखील मी जाबदेणारास नांदायला नेण्याबाबत वकिलांमार्फत नोटीस पाठविली नाही. मी त्यावेळी न्यायालयात जाबदेणाराने नांदायला नेण्यास न्यावे असा आदेश मिळण्याकरीता अर्ज केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला जाबदेणारासोबत संसार करायचा नसल्याने मी तशी नोटीस पाठविली नाही अथवा अर्ज केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणाराने आम्हाला कधीही हाकलून दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदेणाराचा स्वतःहून त्याग केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला प्रस्तुत अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार माझ्या मनाप्रमाणे वागत नाही म्हणून मी जाबदेणार व त्याच्या कुटूबीयांविरुध्द पोलीस ठाण्यात कलम ४९८अ अन्वये खोटी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या खटल्यातून जाबदेणार व त्यांच्या कुटूंबीयांची निर्दोष मुक्तता झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या निकालाविरुध्द अपिल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चिडून जावून अपिल केले आहे. सदर अपिल प्रलंबीत आहे.

११. मी जाबदेणार याचे व्यवसायाबाबत व उत्पन्नाबाबत कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज माझ्या माहेरी आनंदात राहत आहे. मी मालमत्ता व दायित्वाच्या शपथपत्रात बँक खात्याची माहिती नमूद केली नाही कारण त्यावेळी माझे बँक खाते नव्हते. सदर बँक खाते प्रस्तूत अर्ज दाखल केल्यानंतर उघडले आहे याबाबत पुरावा देण्यास मी तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी

उत्पन्न व दायित्वाचे खोटे शपथपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मुळ अर्ज व शपथपत्र खोटे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणाराची वरिष्ठ न्यायालयाने दिलेल्या पोटगी आदेशाव्यतिरीक्त जादा पोटगी देण्याची ऐपत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला जादा पोटगी मागण्याचा कायदेशीर अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे स्वतंत्र उत्पन्नाचे साधन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले **निशाणी १९** ते **निशाणी २१** पर्यंतचे खोटे कागदपत्र दाखल केले आहेत. मी मुलांच्या शाळेची फी वडिलांकडून पैसे घेवून भरले आहे. मी सदर पावत्याबाबत पुरावा देण्यास तयार आहे.

**उलटतपास पुर्ण.**

फेरतपास– नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2025.11.04 16:00:07 +0530

दिनांकः०४/११/२०२५ (प्र.चं.बारटक्के)

ठिकाण – इंदापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.